



# आरोग्य विभाग जिल्हा परिषद कोल्हापूर मार्फत जनहितार्थ माहिती सादर

# नागरिकांसाठी आजारांबद्दल मराठीत माहिती २०२५




श्री. प्रकाश आबिटकर
माननीय मंत्री, सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण महाराष्ट्र राज्य

# लेप्टोस्पायरोसिस बद्दल माहिती




## लेप्टोस्पायरोसिस म्हणजे काय?

हा एक बॅक्टेरियामुळे होणारा संसर्गजन्य आजार आहे. प्रामुख्याने उंदीर, घुशी यांसारख्या प्राण्यांच्या मलमूत्राने दूषित पाणी किंवा चिखलाशी संपर्क आल्याने होतो. पावसाळ्यात याचा धोका अधिक असतो.



👀 **लक्षणे कोणती असतात?**

उत्तर: - ताप, थंडी वाजणे, डोकेदुखी, अंगदुखी

- डोळे लाल होणे, उलट्या, अतिसार
- गंभीर अवस्थेत: कावीळ, मूत्रपिंड निकामी होणे, फुफ्फुसात रक्तस्त्राव, मेंदूज्वर

🧪 **निदान कसे होते?**


उत्तर: - रक्त व लघवीच्या चाचण्या करून निदान केले जाते.

- ELISA किंवा PCR चाचणीद्वारे अचूक निदान शक्य.

💊 **उपचार काय आहेत?**

उत्तर: - अँटीबायोटिक्स (जसे डॉक्सीसायक्लिन, पेनिसिलिन) वापरले जातात.

- गंभीर रुग्णांसाठी हॉस्पिटलमध्ये उपचार आवश्यक.



## प्रतिबंधात्मक उपाय काय आहेत?

उत्तर:

- पावसाळ्यात दूषित पाण्याचा संपर्क टाळा, विशेषतः पूरस्थितीत.
- गमबूट, हातमोजे वापरा, आणि जखम असल्यास ड्रेसिंग करा.
- पिण्याचे पाणी उकळून किंवा फिल्टर करून वापरा.
- पाळीव प्राण्यांशी किंवा उंदीर-घुशींच्या संपर्कानंतर हात स्वच्छ धुवा.
- घराच्या आजूबाजूचा परिसर स्वच्छ आणि उंदीरमुक्त ठेवा.